## कर्ज योजनांसाठी पात्रता अटी व कागदपत्रांची यादी

१) लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.

२) लाभार्थीचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.

४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जीन मनी अपेक्षित नाही. तसेच जात प्रमाणपत्रा बाबत महिलेच्या पतिचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.

५) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.

६) तहसिल किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला (फक्त आदिवासी)

७) शाळा सोडल्याचा दाखला (वय वर्ष १८ ते ४५)

८) तहसिल कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)

९) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना

१०) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वत: इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्त रित्या तयार करुन देणे.

११) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहीत्याचे कोटेशन.

१२) रेशनकार्ड छायाप्रत.

१३) आधारकार्ड

१४) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत

१५) तीन पासपोर्ट साईज फोटो.

१६) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार आवश्यक कागदपत्रे.

१७) स्वत:चा हिस्सा म्हणून भरावी लागणारी ५% सहभाग रक्कम.

१८) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामीनदार घेण्यांत यावे.

## बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बँक खाते उतारा / स्टेटमेंट

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालीका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन